Pune Police

# प्रेस नोट दिनांक २७/०१/२०१७

## समर्थ पोलीस ठाणेकडुन सराईत घरफोडी चोरास अटक व ०४ गुन्हे उघडकीस ५० तोळे वजनाचे किं. रु. १५,००,०००/- (पंधरा लाख) चे सोन्याचे दागीने हस्तगत

समर्थ पोलीस ठाणे गुरनं २३३/२०१६ भादंवि कलम – ४५४, ३८० मधील फिर्यादी - सौ. स्वाती संतोष गायकवाड रा. २७५ नाना पेठ, भाजी मंडई, पुणे यांचे राहते घर दि. ०५/१२/१६ रोजी सकाळी १०.४५ वा. ते दुपारी ०१.१५ वा. चे दरम्यान बंद असताना कोणीतरी अज्ञात चोरटयाने दरवाज्याचे कुलूप तोडुन कपाटातील वजनाचे किं. रु. २,५०,०००/- चे सोन्याचे दागीने घरफोडी चोरी करुन चोरुन नेलेबाबत वरीलप्रमाणे गुन्हा दाखल आहे.

पोलीस ठाणे हद्दीमध्ये अशा प्रकारे घरफोडी चोरीचे गुन्हे घडत असल्याने, घरफोडीचे गुन्हे उघडकीस आणणेबाबत तपास पथकाचे अधिकारी/कर्मचारी प्रयत्न करीत होते. वरील गुन्हयाचे घटनास्थळाजवळ असलेल्या नाना पेठ, भाजी मंडई येथील सीसीटीव्ही फुटेज चेक करता एका इसमाच्या संशयित हालचाली दिसुन आल्या. सदर इसमाचा शोध घेत असताना तो शेवट नाशीक फाटा, पुणे मंबई रोड येथील सीसीटीव्ही फुटेज मध्ये दिसुन आला. त्याचे फुटेजमधील फोटोवरुन बातमीदारामार्फत माहीती घेता तो रेकॉर्डीवरील घरफोडी चोरी करणारा सराईत गुन्हेगार **शरीफ काळे उर्फ अमीर अंतनु शिंदे वय ३० वर्ष गांधीनगर, देहुरोड पुणे व थेरगाव, पाण्याचे टाकीजवळ, पुणे हा असल्याचे निष्पन्न झाले.** सदर आरोपीबाबत मिळालेल्या बातमीवरुन सापळा रचुन आरोपीस दि. २२/०१/१७ रोजी शिताफीने पकडण्यात आले. सदर आरोपी याचेकडे केलेल्या प्राथमिक तपासामध्ये त्याने सदर गुन्हा त्याचा फरारी साथीदार **निलेश अंकुश काळे, वय ३० वर्ष रा. गांधीनगर, देहुरोड पुणे** याचेसह केल्याचे कबुल केले. सदर आरोपीस दाखल गुन्हयात दि. २२/०७/१७ रोजी १७.०० वा. अटक करण्यात आली असुन, त्याची मा. श्री. बी. बा. गवारे, प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र. १ पुणे यांनी दि. २७/०१/२०१७ रोजी पर्यंत पोलीस कस्टडीची रिमांड दिली आहे.

नमुद आरोपीकडे पोलीस कस्टडी रिमांडमध्ये केलेल्या तपासामध्ये त्याने त्याचे साथीदारासह दाखल गुन्हया व्यतिरिक्त समर्थ पोलीस ठाणे हद्दीतील पदमजी पार्क नाना पेठ, नरपतगिर चौक सोमवार पेठ, नवावाडा नाना पेठ या भागात घरफोडी चोरी केल्याची कबुली दिली असुन त्याबाबत गुन्हा रजि. क्र. (१) २२४/१६ (२) १६७/१६ (३) १२१/१६ प्रमाणे गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपी याचेकडुन **दाखल गुन्हयासह एकुण ०४ घरफोडी चोरीचे गुन्हे उघडकीस आणले असुन, गुन्हयातील चोरीस गेलेले एकुण ५० तोळे वजनाचे कि.रु. १५,००,०००/- (पंधरा लाख रुपये) चे सोन्याचे दागीने व गुन्हा करणेसाठी वापरण्यात आलेली कटावणी हस्तगत करण्यात आली आहे.** सदर आरोपींनी अशा प्रकारे आणखी पुणे शहरात फरासखाना, चिंचवड, वाकड पोलीस ठाणे हद्दीत ८ ते १० गुन्हे केल्याची कबुली दिली असुन त्या अनुषंगाने तपास चालू आहे. फरारी आरोपी निलेश अंकुश काळे याचा देखील शोध चालू आहे.

सदर दोन्ही आरोपी पोलीस अभिलेखावरील घरफोडी चोरी करणारे सराईत गुन्हेगार असुन, त्यांचेविरुध्द यापुर्वी चतुश्रृंगी, निगडी, पिंपरी, खडकी, वारज़े, डेक्कन, येरवडा, विश्रांतवाडी पोलीस ठाणेस एकुण ३२ गुन्हे दाखल आहेत. सदर आरोपी हे प्रामुख्याने पाळत ठेवुन दिवसा घरातील लोक बाहेर पडल्यानंतर सदर घरांमध्ये चोरी करीत असतात.

सदरची कामगिरी मा. श्री. प्रदीप देशपांडे, अपर पोलीस आयुक्त द.प्रा.वि., श्री. पकंज डहाणे, पोलीस उप आयुक्त, परि.२, श्री. निलेश मोरे, स.पो.आ. लष्कर विभाग यांचे मार्गदर्शनाखाली राजेंद्र मोहिते, वरिष्ठ पोलीस निरिक्षक समर्थ पो.स्टे, सतिश चव्हाण, पोलीस निरिक्षक (गुन्हे) पोलीस उप निरिक्षक – नितीन अतकरे पोलीस कर्मचारी संतोष काळे, दत्तात्रय येळे, अनिल शिंदे, नवनाथ भोसले, गणेश कोळी, अजय शितोळे, बाळासाहेब भांगले, साहील शेख, सुशील लोणकर यांनी केली आहे.


समर्थ पोलीस स्टेशन पुणे शहर